महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : सीएमए-०४२३/सीआर-०१/२०२३/जाहिरात                                        दिनांक : १९ एप्रिल, २०२३

**-: शुद्धीपत्रक :-**

**विषय : महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२३ (जाहिरात क्रमांक ११/२०२३)**
अन्न व औषध प्रशासकीय सेवेतील 'सहायक आयुक्त अन्न, गट-अ' आणि 'अन्न सुरक्षा अधिकारी, गट-ब' या संवर्गांकरिता 'बी. ए. एम. एस.' तसेच बी.एस.सी.-कृषि पदवीधारक उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या मागणीपत्रानुसार अन्न व औषध प्रशासन सेवेतील सहायक आयुक्त अन्न, गट-अ आणि अन्न सुरक्षा अधिकारी, गट-ब या संवर्गाच्या भरतीकरिता दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी जाहिरात व दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी शुद्धीपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

२. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक ३७०/२०२३ प्रकरणी मा. न्यायाधिकरणाने दिनांक ५ एप्रिल, २०२३ रोजीच्या अंतरिम आदेशान्वये 'बी. ए. एम. एस.' पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांना अर्ज सादर करण्याची मुभा देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार सदर मूळ अर्जावरील मा. न्यायाधिकरणाच्या अंतिम आदेशाच्या अधीन राहून, सहायक आयुक्त अन्न, गट-अ आणि अन्न सुरक्षा अधिकारी, गट-ब या संवर्गाकरीता 'बी. ए. एम्. एस्.' पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

३. शासन पत्र, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्रमांक एफडीएस-२०२०/प्र.क्र.१०५/२०/औषधे-१, दिनांक १८ एप्रिल, २०२३ द्वारे सहायक आयुक्त अन्न, गट-अ तसेच अन्न सुरक्षा अधिकारी, गट-ब या संवर्गाच्या शैक्षणिक अर्हतेसंदर्भात कृषि शास्त्र शाखेतील पदवीच्या अनुषंगाने प्राप्त अभिप्रायानुसार बी.एस.सी. (कृषि) पदवीधारक उमेदवारांना अर्ज सादर करण्यास खालीलप्रमाणे संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**३.१** महाराष्ट्र नागरी सेवा परीक्षेतील इतर सेवांकरीता अर्ज सादर केलेल्या तथापि, अन्न व औषध प्रशासन सेवेकरीता विकल्प सादर करू शकले नाहीत अशा बी. ए. एम. एस. व बी.एस.सी. (कृषि) पदवी धारक उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईल मध्ये प्रस्तुत संवर्गाकरीता Recheck Eligibility या पर्यायाद्वारे पात्रता तपासून पात्र असल्यास केवळ अन्न व औषध प्रशासन सेवेतील अन्न सुरक्षा अधिकारी, गट-ब तसेच सहायक आयुक्त अन्न, गट-अ संवर्गाकरीता विकल्प सादर करण्याची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**३.२** महाराष्ट्र नागरी सेवा परीक्षेकरीता अर्ज सादर केला नाही तथापि, नव्याने अन्न व औषध प्रशासन सेवेकरीता अर्ज सादर करण्यास इच्छुक असतील अशा फक्त बी. ए. एम. एस. व बी.एस.सी. (कृषि) पदवी धारक उमेदवारांकरीता केवळ अन्न व औषध प्रशासन सेवेतील अन्न सुरक्षा अधिकारी, गट-ब तसेच सहायक आयुक्त अन्न, गट-अ संवर्गाकरीता अर्ज सादर करण्याची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येत आहे.

४. सहायक आयुक्त अन्न, गट-अ आणि अन्न सुरक्षा अधिकारी, गट-ब संवर्गाकरीता वी नमूद केल्याप्रमाणे पात्र उमेदवारांना अर्ज सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | **अर्ज सादर करण्याचा कालावधी** | **दिनांक २० एप्रिल, २०२३ रोजी १४.०० वाजल्यापासून दिनांक २७ एप्रिल, २०२३ रोजी २३.५९ पर्यंत** |
| २ | **ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक** | **दिनांक २७ एप्रिल, २०२३ रोजी २३.५९** |
| ३ | **भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक** | **दिनांक २८ एप्रिल, २०२३ रोजी २३.५९** |
| ४ | **चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक २९ एप्रिल, २०२३ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये** |

५.......

**५.** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: सनिव २०१३/प्र.क्र.१४/कार्या-१२, दिनांक ३ मार्च, २०२३ अनुसार कमाल वयोमर्यादेत दोन वर्षे इतकी शिथिलता देय राहील.

**६.** इतर सर्व अटी व तरतुदी प्रसिद्ध करण्यात आलेल्या तपशीलवार मूळ जाहिरात क्रमांक ११/२०२३ मध्ये नमूद केल्यानुसार राहील.

**७.** सदर शुद्धीपत्रक, मूळ जाहिरात क्रमांक ११/२०२३ तसेच दिनांक १७ मार्च, २०२३ रोजीचे शुद्धीपत्रक आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सह सचिव, जाहिरात

ठिकाण : मुंबई

महाराष्ट्र लोकसेवा आयोग.